**मंत्रिमंडळ निर्णय**

**२ जून २०१५**

**(मंत्रिमंडळ बैठक क्र. ३३)**

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | अपारंपरिक स्त्रोतांपासून १४ हजार ४०० मे.वॅ. वीजनिर्मितीचा निर्धार<br>**नवीन व नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांपासून वीजनिर्मितीच्या एकत्रित धोरणास मंजुरी** | ऊर्जा विभाग |
| २ | **आपदग्रस्त शेतकऱ्यांना २०० कोटींची मदत** | मदत व पुनर्वसन विभाग |
| ३ | **अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाच्या उभारणीचा मार्ग मोकळा**<br>शासनाचा ५० टक्के सहभागाचा निर्णय | परिवहन विभाग |
| ४ | **मुंबई महानगर क्षेत्रातील उद्योगांचे स्थान निश्चयन धोरण रद्द** | उद्योग विभाग |

**मंत्रिमंडळ निर्णय**

ऊर्जा विभाग

अपारंपरिक स्त्रोतांपासून १४ हजार ४०० मे.वॅ. वीजनिर्मितीचा निर्धार

## नवीन व नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांपासून वीजनिर्मितीच्या एकत्रित धोरणास मंजुरी

नवीन व नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांपासून (अपारंपरिक ऊर्जास्त्रोत) वीजनिर्मितीच्या एकत्रित धोरणास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. या महत्त्वाकांक्षी धोरणानुसार पुढील ५ वर्षात राज्यात अपारंपरिक स्त्रोतांपासून सुमारे १४ हजार ४०० मेगावॅट इतकी वीज निर्माण केली जाणार असून कोणताही जास्तीचा मोठा आर्थिक बोजा न पडता या धोरणाची अंमलबजावणी शक्य होणार आहे.

या धोरणांतर्गत राज्यात पारेषण संलग्न विविध वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. त्यामध्ये पवन उर्जेपासून ५००० मे.वॅ., उसाची चिपाडे व कृषी अवशेषांपासून १००० मे.वॅ. सहवीज निर्मिती, लघु जलविद्युतपासून ४०० मे.वॅ., कृषिजन्य अवशेषांवर आधारित ३०० मे.वॅ., टाकाऊ औद्योगिक पदार्थांपासून २०० मे.वॅ. आणि सौर उर्जेपासून ७५०० मे.वॅ. वीज निर्मिती अशी एकूण १४ हजार ४०० मे.वॅ. वीज निर्मितीचे उद्दिष्ट या धोरणानुसार ठेवण्यात आले आहे.

या धोरणानुसार विकासकाने प्रकल्पापासून निर्माण होणाऱ्या विजेचा स्वत: वापर केल्यास (३० टक्के सहवीज निर्मितीकरिता व ५ टक्के इतर प्रकल्पांसाठी) त्यांना विद्युतशुल्कात पुढील १० वर्षांसाठी सूट देण्यात येणार आहे. त्यापोटी शासनावर ३७० कोटींचा भार पडेल. ऊस खरेदी करात सूट दिल्याने शासनावर ३ हजार ३७५ कोटीचा भार पडेल. मात्र, या धोरणानुसार उसाच्या चिपाडांपासून होणाऱ्या सहवीजनिर्मितीच्या १ हजार मे.वॅ. च्या उद्दिष्टामुळे राज्यात पुढील ५ वर्षात ५ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. हरित ऊर्जा निधीमधून निष्कासन व्यवस्था आणि भांडवली अनुदानापोटी ४१२ कोटी रुपये खर्च होणार आहेत. या साऱ्या सवलतींमुळे राज्य शासनावर एकूण ४ हजार १५६ कोटी रुपयांचा भार पडणार असला तरी वीज शुल्काच्या वसुलीपोटी ३ हजार ८८५ कोटी रुपये प्राप्त होणार आहेत. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचा प्रत्यक्षातील खर्च केवळ २७१ कोटी रुपयांचा होईल.

या धोरणानुसार अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून या प्रकल्पांच्या उभारणीसाठी प्रशासकीय पातळीवरील कार्यवाही सुलभ करण्यात आली आहे. त्यात बिगर शेती जमिनीचा मानीव दर्जा, मानीव औद्योगिक दर्जा, मानीव खुला प्रवेश, महाऊर्जात होणारे नोंदणीकरण सुलभ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसणे, आदी मुद्द्यांचा समावेश आहे.

या धोरणानुसार सौर, पवन व औद्योगिक टाकाऊ पदार्थांपासून उत्पादित केलेली वीज स्पर्धात्मक निविदा पद्धतीने खरेदी करण्यात येईल. त्याचा फायदा राज्यातील सर्व वीज ग्राहकांना रास्त दरात मिळण्यास होणार आहे. तसेच संबंधित निर्मिती संस्थांना आर्थिक सवलती देण्यात येणार असून त्यात पुढील दहा वर्षासाठी वीजशुल्क माफी, लघुजल-कृषीजन्य अवशेषांपासून वीजनिर्मिती व औद्योगिक टाकाऊ पदार्थांपासून वीजनिर्मिती करणाऱ्या संस्थांना भांडवली अनुदान व निष्कासन व्यवस्थेसाठी १ कोटी रुपयांपर्यंतचा विशेष परतावा देण्यात येईल. या धोरणात ठरविलेल्या उद्दिष्टात

फेरबदलासाठी तसेच मध्यवर्ती आढावा घेण्यासह अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.

या धोरणानुसार सूट देण्यात आलेल्या गोष्टींवरील खर्च अतिरिक्त वीज शुल्क आकारणीद्वारे व वित्त आयोगाकडून मिळालेल्या आर्थिक लाभातून भागविला जाणार आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीसाठी केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाने राज्याला प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ९६१ कोटी रुपये दिले आहेत.

-----o-----

मदत व पुनर्वसन विभाग

## आपदग्रस्त शेतकऱ्यांना २०० कोटींची मदत

राज्यात फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना विशेष बाब म्हणून मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना द्यावयाच्या मदतीसाठी राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना २०० कोटींचा निधी देण्यात आला असून तो आता शेतकऱ्यांना तातडीने वितरित करण्यात येणार आहे. या निधीतून कोकण विभागाला ६९ कोटी ८५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असून प्रामुख्याने कोकणातील आपदग्रस्त आंबा आणि काजू उत्पादकांना मदत मिळणार आहे.

याशिवाय रब्बी हंगाम २०१४-१५ मधील बाधित शेतकऱ्यांना कृषी पिके व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी अर्थसहाय्य करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक, पुणे, औरंगाबाद व नागपूर यांना ३६४.२८ कोटी निधीचे वितरण करण्यात आले आहे. शासनाच्या या मदतीमुळे सर्व बाधित शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळाला आहे.

-----o-----

परिवहन विभाग

## अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाच्या उभारणीचा मार्ग मोकळा

शासनाचा ५० टक्के सहभागाचा निर्णय

राज्यातील महत्त्वपूर्ण अशा अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या २६१ किमी अंतराच्या नवीन रेल्वे मार्गाच्या उभारणीत राज्य शासनाने ५० टक्के सहभाग देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. या रेल्वेमार्गाच्या निर्मितीसाठी एकूण २८२६ कोटी रुपयांचा खर्च अंदाजित असून त्यापैकी १४१३ कोटी रुपयांचा खर्च राज्य शासन उचलणार आहे.

राज्यातील ग्रामीण विशेषत: अविकसित भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी आणि लवकरात लवकर हे रेल्वेमार्ग पूर्ण व्हावेत यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पातील आर्थिक निधी अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देणार आहे. या प्रकल्पाची कार्यवाही गेली अनेक वर्ष रखडली होती. फेब्रुवारी २००९ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने याबाबत निर्णय घेऊन त्यावेळी निश्चित करण्यात आलेल्या १०१० कोटी खर्चाच्या ५० टक्के म्हणजे ५०५ कोटींच्या राज्याच्या आर्थिक सहभागास मान्यता दिली होती. मात्र याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्याने प्रकल्पाच्या अंदाजित खर्चात मोठी वाढ होत गेली. सध्या या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून भूमीअधिग्रहण अंतिम टप्प्यात आले आहे. या रेल्वेमार्गामुळे मराठवाड्याच्या दळणवळणाला गती प्राप्त होणार आहे.

-----०-----

उद्योग विभाग

## मुंबई महानगर क्षेत्रातील उद्योगांचे स्थान निश्चयन धोरण रद्द

मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील औद्योगिक स्थान निश्चयन धोरण कालबाह्य झाल्याने ते रद्द करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. याबाबत मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये (डीसीआर) उद्योगांच्या स्थान निश्चयनाबाबत योग्य ती तरतूद करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे या उद्योगांना आपल्या विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी उद्योग विभागाच्या परवानगीची गरज लागणार नाही.

राज्याचे प्रथम औद्योगिक स्थान निश्चयन धोरण हे डिसेंबर १९७४ पासून लागू करण्यात आले होते. त्यानंतर आवश्यकतेनुसार या धोरणाचे विविध टप्प्यांत सुलभीकरण करण्यात आले. या धोरणानुसार विद्यमान व नव्याने स्थापित होणाऱ्या उद्योगांच्या विस्तारिकरणांतर्गत काही विशिष्ट उद्योगांना परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात आले होते. हे धोरण १९७४ मध्ये जाहीर करण्यात आले. त्यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रदूषण नियंत्रणासंदर्भात प्रभावी यंत्रणा अस्तित्वात नव्हती. जलप्रदूषण प्रतिबंध व अधिनियम-१९७४, हवा प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण

अधिनियम १९८१, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ व पर्यावरण परिणाम मूल्यांकन नियम-२००६ हे सर्व प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित अधिनियम या धोरणानंतर अंमलात आले. तसेच त्यानंतरच्या कालखंडात महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यातील उद्योगांच्या प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी अंमलबजावणीही सुरु केली.

सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदुषणास प्रतिबंध व नियमन करण्याबाबत प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी होत असल्याने हे औद्योगिक स्थान निश्चयन धोरण कालबाह्य ठरले होते व मुंबई प्राधिकरण क्षेत्रातील उद्योगांना आधुनिकीकरण व विस्तारिकरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले होते. आता या उद्योगांना आपल्या याबाबतच्या कार्यवाहीसाठी उद्योग विभागाच्या परवानगीची गरज लागणार नाही. तसेच राज्यातील औद्योगिक विकासासाठी सध्या सुरू असलेल्या -इज ऑफ डुईंग बिझनेस॰ मोहिमेलाही या निर्णयामुळे मदत होणार आहे. तसेच उद्योजकांना आपल्या उद्योगाशी संबंधित एकाच प्रकारच्या कार्यवाहीसाठी विविध शासकीय यंत्रणांकडे वारंवार जावे लागणार नाही.

-----०-----